REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 10 | JULY - 2020

# सर्वोदय : एक गांधीवादी विचार

**प्रा. तळणीकर एस.जी.**
राज्यशास्त्र विभाग,
तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव, जिल्हा हिंगोली

## प्रस्तावना


आचार्य सामंत भद्र या जैन मुनीच्या लेखणीतून गांधीजींनीसर्वोदय हा शब्द घेतला. सर्वोदय हे एक विशीष्ट असे श्रेष्ठ भारतीय राजकीय तत्वज्ञान आहे. म.गांधी या विचारसरणीचे उदगाते असले तरी आचार्य विनोबा भावेंनी यात मोठी भर टाकली आहे. एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते की महात्मा गांधीच्या विचारावर रस्किनच्या 'un to the last' या ग्रंथाचा मोठा प्रभाव आहे. 'un to the last' याला विशिष्ठ अर्थ आहे. येशु ख्रिस्त आपल्या शिष्यांना प्रसाद देताना म्हणाला होता की, 'हा शेवटच्या माणसापर्यंत पोहचवा' वेगळया शब्दात त्याचा अर्थ असा की मानवी जीवनाच्या फायदयापासून कोणीही व्यक्ती वंचित राहता कामा नये, खरे म्हणजे 'un to the last' चे भाषांतर 'अंत्योदय' होते. परंतु गांधीजींनी त्याला सर्वोदय असे म्हटले आहे त्याचा आशय हा की मानवी प्रगतीचा लाभ केवळ शेवटच्यालाच नव्हे तर सर्वांना मिळाला पाहिजे. जवळचा दूरचा कोणीही असो सर्वांना मानवी प्रगतीचा लाभ होणे आवश्यक ठरते.

## सर्वोदय

आधुनिक समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्या सोडविण्यासाठी गांधीजींच्या विचारांचा अवलंब करणे म्हणजे सर्वोदय होय. यामध्ये सर्वांचा विकास आला पाहिजे असे यामध्ये अभिप्रेत आहे. विनोबाजी, जयप्रकाश नारायण या विचारवंतानी गांधजींच्या विचारानुसारच सर्वोदयचा भारताच्या भुमीमध्ये विकास करण्याचा प्रयत्न केला. सर्वोदय हे गांधी विचाराचे अपत्य आहे यामध्ये गांधीजींना सामाजिक परिवर्तन अभिप्रेत होते. त्यांच्या मते समाजाचा पाया सत्य, अहिंसा हा असेल. असे स्वप्न बाळगण्याचे कारण म्हणजे भारतातील समाज हा विशमाधिष्ठीत आहे. म्हणून नवसमाज हा समताधिष्ठीत असेल. संघर्ष, शोषण, विषमता या समाजात असणार नाही. हे समुळ नाहीसे करण्यासाठी समतेवर आधारीत समाज निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न होते त्यासाठी सत्य आणि अहिंसा हे दोन मार्ग त्यांनी अवलंबिले. समाजाच्या निम्न स्तरावरील व्यक्तीला सर्व सोयी झाल्या पाहिजे. या वर्गातील व्यक्तीला स्वराज्य हे माझ आहे असे वाटले पाहिजे.

## सर्वोदयाची मुलभूत गृहीते:

प्रत्येक व्यक्तिचे हित व सार्वजनिक हित यांच्यामध्ये अव्दित आहे- व्यक्तीने या समाजाशी एकरूप् होउन राहीले पाहिजे. त्यामुळे सर्वोदयाला उच्च, कनिष्ठ, बुध्दिमान, मतीमंद या सर्वांचाच विकास अभिप्रेत आहे (Live and let live) सर्वोदयामध्ये 'जगा आणि जगू दया' या तत्वापेक्षा सुध्दाएक उच्चतम असे तत्व गृहीत आहे. प्रत्येक व्यक्तीने इतराकरिताच जगले पाहिजे म्हणून 'इतराकरिता जगा', (Live for other) असे सर्वोदयाचे तत्व म. गांधीजीचे वेदान्ताचे तत्व सर्वोदयाने अमलात आण्याचा प्रयत्न केला आहे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती इतरासाठी जगू लागतील तेंव्हा सर्व संघर्ष नाहीसे होतील. ही एक नैसर्गीक परिस्थिती आहे. कुटूंबामध्ये आई, वडिल हे आपल्या मुलांसाठी जगत असतात सर्व सदस्य एकमेकांसाठी जगत असतात ही एक सहज अशी



प्रेरणा आहे. समाज हा एक अश्याच प्रकारचे मोठे कुटूंब आहे समाजातील व्यक्तींनी स्वतःसाठी न जगता इतरांसाठी जगल पाहिजे. मुलतः मनुष्य हा निःस्वार्थी आहे, सदाचरणी आहे, सहकार्याची भावना ठेवणारा आहे. परोपकारी तसेच शांतताप्रिय आहे. म्हणजे सर्वोदयाची अशी गृहीते आहेत की तो मुळात वाईट नाही समाजव्यवस्था व्यक्तीला वाइट करते, म्हणून जर समाजात व्यक्तीमध्ये फेरफार केले तर मनुष्य चांगला राहील. मनुष्याच्या अंगी सत्य, स्वार्थ, त्याग, आत्मसंयम इ. संस्कार ग्रहण करण्याची क्षमता मानसात आहे असे गांधीजी मानतात

लोकशाहीमध्ये सुध्दा राजकीयपक्ष, संस्था, संघटना हया व्यक्तीला दुर्गुणाकडे नेतातकायदा, वर्तमानपत्रे, राज्य यावर ते अविश्वास प्रगट करतात. या सर्व संघटनामुळे प्रश्न सोडविले तर जातच नाही तर असलेले प्रश्न आणखी बिकट बनविले जातात व नव्या प्रश्नांना जन्म दिला जातो. म्हणून सर्वोदयाने भांडवल शाहीला विरोध केला तसेच सत्तेच्या केंद्रीकरणाला सुध्दा विरोध केला आहे. सर्वोदयाच्या विचारानुसार 'भारत हा खेडयांचा देश आहे. भांडवलशाहीमुळे खेडयातील ग्रामीण जीवनाची उपेक्षा होते राज्यव्यवस्थेतील निरनिराळया घटकांचा दाब खेडयावर येतो कारण 85 टक्के लोक खेडयात राहतात. अन्नधान्य, कारखानदारीला लागणारा जो कच्चा माल आहे याचे सर्व उत्पादन खेडयामध्ये होते. परंतु ही शहरी संस्कृती (भांडवलशाही संस्कृती) ही खेडयाचे शोषण करते. शहरे हे एक प्रकारे परोपजीवी आहेत, ते खेडयावर पोसले जातात. म्हणून सर्वोदयाचा विचार हा प्रामुख्याने भारतातील खेडयांचा विचार आहे म्हणून गांधीजीं असे म्हणतात की, 'खेडयांचा विचार राज्यव्यवस्थेला करावा लागेल.

खेडयांना केंद्रीत ठेवूण विचार करायला पाहिजे. या राष्ट्रकुलात प्रत्येक खेडे एक स्वायत्त घटक असेल आणि यामध्ये प्रत्येकाच्या किमान गरजा पुर्ण होतील. मग राज्याची गरज राहणार नाही. म्हणजे अराज्यवाद निर्माण होईल व भेदा भेद राहणार नाही. गांधीजीची हत्या झाल्यामुळे हे विचार विचारच राहिले. गांधीजीच्या हत्येनंतर गांधी विचाराच अपत्य म्हणून गांधीजीचे मानसपुत्र विनोबाजी भावे यांनी पुढील विचार मांडले व गांधीजींचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी जीवनभर प्रयत्न केले

विनायक नरहरपंत भावे यांचा जन्म 11 सप्टेंबर 1895 रोजी महाराष्ट्रात झाला. त्यांचे घराणे हे धर्मपारायण उदार होते ते लहानपनीच गांधीजीकडे आकर्षित झाले. त्यामूळे ते गांधीजीच्या आश्रमात दाखल झाले क्रांती आणि अध्यात्म याचा संगम विनोबाजींच्या ठिकाणी होता. त्यांनी वर्धा येथे पवनार आश्रमाची स्थापना केली त्यांनी गिताई मराठीत सांगीतली. 1942 च्या चलेजाव चळवळीत विनोबाजींचा सहभाग होता. 30 जानेवारी 1948 ला गांधीजींची हत्या झाली. त्यानंतर सेवाग्राम येथे गांधीजींच्या अनुयायाचे सम्मेलन भरले त्यामध्ये गांधीजींच्या विचारांचा प्रसार करण्यातसाठी संघटना सथापन करण्याचे ठरले त्यादृष्टीने सर्वोदय व सर्वसेवा संघ या दोन संघटनांची स्थापना करण्यात आली. गांधीजींच्या हत्येमुळे त्यांचे अपुर्ण राहीलेले कार्य तडीस नेणे हे उदिष्ट ठरविण्यात आले

सर्वोदय शब्दाचा प्रयोग पहिल्यांदाच गांधीजींनी रस्कीनच्या पुस्तकाचे भाषांतर करताना वापरला सर्वोदय म्हणजे सर्वाचा उदय सर्वोदयात संपुर्ण समाजाच्या हिताची तसेच कल्याणाची कल्पना आहे हा सिध्दांत बहुजनांचे कल्याण यावर हा सिध्दांत बेन्थॅमच्या बहुजनांचे कल्याण यावर विश्वास ठेवीत नसून सर्वांचे कल्याण यावर आधारलेला आहे सर्वोदयाची ही अभिनव कल्पना विनोबाजींनी अधिक विस्तारली आहे. विनोबा म्हणतात ''सर्वोदयाचे ध्येय काही व्यक्तिचे किंवा अधिकतम लोकांचे कल्याण किंवा उत्कर्ष साधणे हे नाही, आम्ही अधिकतम व्यक्तिंच्या अधिकतम सुखामुळे संतुष्ट नाही आम्ही सर्वांच्या उच्च तसेच कनिष्ठ, सबल-दुर्बल, बुध्दीमान आणि बुध्दिहीन यांच्या सुखामुळे संतुष्ट होतो सर्वोदय याचे उदात्त भावनेला प्रगट करातो.'' थोडक्यात, सर्वोदय श्रीमंताच्या नैतिक आणि गरिबांच्या भौतिक उन्नतीवर भर देतो

सर्वोदय व्यक्तींच्या भौतिक तसेच नैतिक उन्नतीवर भर देत असल्यामुळे तो इतर समाजवादी विचारापेक्षा अलग आहे तो पुर्णतः भारतीय आहे. त्याचा आधार साम्यवादी विचारपध्दती नसून वेद आहेत. म्हणूनच डॉ. राधाकृष्णन म्हणतात, ''सर्वोदयी भारतीय जीवन पध्दतीमूळ परंपरेवर आधारलेली आहे केवळ भौतिक सुखामुळे व्यक्तीला सुख प्राप्त होत नाही त्याला सुखप्राप्तीसाठी अध्यात्मिक सुख मिळणेही आवश्यक असते.'' मानवी समाजाचा विकास राज्यकडून होणे अशक्य आहे, ही सर्वोदयाची भुमीका आहे. ही भुमिका आजच्या विचाराहून सर्वस्वी वेगळी आहे. कारण आज मानवी जीवनात राज्यसंस्थेला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. व्यक्तीचे समाजाचे राज्यावर अवलंबन कमालीचे वाढले आहे. राज्य ही शक्ती धारण करणारी संघटना आहे हिंसेचा यापाशी मार्ग आहे म. गांधीजी प्रमाणेच विनोबाजींनी सुध्दा राज्याच्या शक्तीमय मार्गावर विश्वास ठेवला नाही. असेही म्हणता येईल की, दार्शनिकदृष्टया विनोबाजी अराज्यवादी होते.

सर्वोदयात साम्यवादाप्रमाणे विशिष्ट वर्गाच्या उत्कर्षावर भर नसून संपूर्ण समाजाच्या उत्कर्षावर भर दिलेला आहे यासाठी व्यक्तीने स्वार्थ, धर्म, जाती, संप्रदाय आणि विभागीय तसेच राष्ट्र इ. संकुचित भावनांचा त्याग करणे आवश्यक आहे विनोबाजी एका ठिकाणी म्हणतात ''आम्ही संपुर्ण मानव समाजाला एका शरीराप्रमाणे समजले पाहिजे. समाजाचे स्वतंत्र व्यक्तित्व मान्य केले पाहिजे शरीराच्या एका अवयवास इजा झाल्यास संपूर्ण शरीराला पीडा होते त्याच प्रमाणे समाजाचा एखादा घटक अविकसीत राहिल्यास त्याचे परिणाम संपुर्ण

समाजावर होतात.'' आणि म्हणूनच व्यक्तीचे हित आणि सामाजिक हित यात फरक नाही, कारण तो समाजरूपी शरीराचा अविभाज्य घटक आहे.

### सर्वोदयाची आधारभूत तत्वे:

सर्वोदयाचा अर्थ समजावून घेतल्यानंतर त्याची आधारभूत तत्वे समजावून घेणे देखील गरजेचे आहे कारण ही तत्वे समजल्याशिवाय सर्वोदयी समाज कसा असेल हे समजणे शक्य नाही विनोबांच्या मते सर्वोदयसमाज मुख्यतः खालील तत्वावर भर देतो.

1. अहिंसा - सर्वोदय समाजाचा मुख्य आधार अहिंसा हा होय. विनोबांजीची पक्की श्रध्दा होती की, सर्वोदयी समाजाची कल्पना वास्तवात आणण्यासाठी अहिंसेशिवाय अन्य पर्याय नाही. सर्वोदयी समाजातील व्यक्ती परस्परातील मतभेद हिंसेने न सोडविता अहिंसेने आणि मतपरिवर्तनाने सोडवतील.

2. समानता - सर्वोदयाचा दुसरा आधार समानता होय. सर्वोदय समाजात कोणत्याही प्रकारची असमानता राहणार नाही. सर्वोदयाचे ध्येय सामाजिक तसेच आर्थिक समानता प्रस्थापित करणे हे होय. प्रत्येक व्यक्तीला तीच्या आवश्यक गरजा पुर्ण करता येतील. आवश्यकतेपेक्षा जे जास्त असेल ते तो समाजाकडे सोपविल.

3. विकेन्द्रीकरण - विकेन्द्रीकरण हे आर्थिक समानता स्थापन करण्यासाठी आवश्यक आहे. उत्पादनांच्या सर्व साधनांचे विकेंद्रीकरण व्हायला पाहिजे. असे सर्वोदयवादी मानतात. उत्पादनाचे केंद्रीकरण झाले तर समाजात वर्गविग्रह वाढेल आणि त्यामूळे असमानता प्रस्तापित होईल अशी भूमिका आहे.

4. कुटिरोद्योग - मोठया उद्योगांच्या विकेंद्रीकरणावर जसे सर्वोदयवादी भर देतात तसेच त्यांचा भर कुटिरोद्योगाच्या विस्तारावर सुध्दा आहे. कुटिरोद्योगाचा विस्तार हा खेडयाचा विकास घडवून आणतो. कुटिरोद्योगाच्या विकासामुळे खेडयातील जनतेला काम मिळेल. भारतात विशेषतः शेतीचे काम नसलेल्या वेळात अशा उद्योगधंदयांमुळे खेडयातील व्यक्तींना वेळेचा उपयोग करता येईल, तसेच पूरक किंवा जोडधंदा म्हणून आर्थिक स्थितीही सुधारेल.

सर्वोदयवादी कुटिरोद्योगावर भर देतात याचा अर्थ ते मोठया उद्योगधंदयाच्या विरूध्द आहेत असा मात्र नव्हे. लघुउद्योग आणि कुटिरोद्योग हे मोठया उद्योगधंदयांना पूरक असावेत. ज्या मोठया उद्योगधंदयांमूळे लघुउद्योग नष्ट होतील, अशा उद्योगधंदयांना सर्वोदयवादयांचा विरोध आहे. थोडक्यात ज्या मोठया उद्योग धंदयामुळे छोटया उद्योगांचे अस्तित्वच धोक्यात येईल अशांना सर्वोदयवादयांचा विरोध आहे. उदा. कापड गिरण्यामुळे हजारो विणकर बेकार झाले आहेत त्यांना इतरत्र काम मिळणे अशक्य झाले आहे. नागपुरातील तसेच भिवंडी येथील विणकरांनी केलेली चळवळ यांचे उत्तम उदाहरण होय.

### थोडक्यात सर्वोदयाची मूलतत्वे खालील प्रमाणे सांगता येतील.

1. सर्वोदयाचा भर सर्व व्यकतीच्या उन्नतीवर आहे.
2. या उन्नतीत व्यक्तीच्या भौतिक तसेच अध्यात्मिक उन्नतीचा समावेशक आहे.
3. सर्वोदयाचा भर व्यक्तीतील स्वतःची भावना नष्ट करून समाजहिताची भावना जागृत करण्यावर आहे.
4. सर्वोदयात सर्वांना विचार स्वातंत्र्य आहे.
5. सर्वोदय सर्व व्यक्ती समान आहेत. सर्वोदय वंश, जात, धर्म, संपत्ती, राज्य-राष्ट्र अशा भेदावर विश्वास ठेवीत नाही.
6. सर्वोदय ही विश्वव्यापी संकल्पना आहे.
7. सर्वोदयाचा भर हा साधनांच्या शुचीतेवर आहे.
8. सर्वोदय अहिंसा आणि हृदयपरिवर्तन यावर भर देत असून त्याला राज्याची दंडशक्ती किंवा हिंसक क्रांती मान्य नाही.
9. सर्वोदय आर्थिक आणि राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणावर भर देतो, राजकीय सत्ता ही जनतेच्या हाती असेल.
10. सर्वोदय समाजात स्वातंत्र्य असले तरी पक्षपध्दती राहणारनाही.

## सारांश

थोडक्यात सर्वोदयाचा उद्देश असा समाज निर्माण करणे होय की, ज्यात समता प्रस्थापित होईल, शोषण थांबेल आणि प्रत्येकाचा सर्वांगीण विकास होईल. या समाजात व्यक्तीच्या भौतिक विकासाबरोबरच त्यांच्या नैतिक विकासाकडेच विशेष लक्ष पुरविल्या जाईल सर्वोदय हा केवळ भारतापुरताच मर्यादित नाही तर तो विश्वव्यापी स्वरूपाचा आहे. भारतात सर्वोदयाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.
1) अस्पृश्यता निवारण 2) जातिभेद नष्ट करणे 3) दारूबंदी 4) खादी आणि ग्रामोद्योगाचा विकास 5) समानता 6) अरोग्य आणि स्वच्छता 7) भाषीक वादाची समाप्ती 8) हिंदी भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून प्रचार करणे 9) शेतीचा विकास 10) मजूरांची संघटना स्थापन करणे 11) मागासलेल्या जाती जमातींचा विकास 12) संकटग्रस्त लोकांना मदत 13) गोपालन 14) प्राकृतिक चिकित्सा 15) अन्य सार्वजनिक कल्याणकारी योजना आखणे आणि त्या कार्यान्वित करणे.

## संदर्भ

1. माझ्या स्वप्नांचा भारत - म. गांधी नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद.
2. म. गांधी जसे पाहिले जाणले - विनोबांजी परमधाम प्रकाशन, पवनार.
3. हिंद स्वराज - म. गांधी- जनजीवन ट्रस्ट अहमदाबाद.
3. भोळे भा.ल. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर, 1991